1

Year- 2016-17

# राजर्षि शाहू महाराज :

## सामाजिक सुधारणा व सद्यःस्थिती

(समाजशास्त्र)



: संपादक :

प्रा.आर.डी.राठोड

: मुख्य संपादक :

प्राचार्य, डॉ.आर.के.इप्पर

ISBN 978-93-5240-092-8

# अनुक्रमणिका

१. महाराष्ट्रातील सामाजिक परिवर्तनामध्ये राजर्षी शाहु महाराजांचे धोरण व सद्यस्थिती
डॉ.दिलीप खैरनार, श्रीमती स्वाती काळे ..................... १७

२. राजर्षी शाहु महाराजांच्या शैक्षणिक विचारसरणी व कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास
प्रा. शशिकांत दतोपंत परळकर ..................... २२

३. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
प्रा. डॉ. तंगलवाड डी.एम. ..................... २५

४. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
प्रा. बाळासाहेब विश्वनाथ मुंडे ..................... २९

५. राजर्षि शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
प्रा. सायली समुद्रे ..................... ३१

६. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
प्रा.डॉ.आचार्य आर.डी. ..................... ३४

७. राजश्री शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण
प्रा. डॉ. माधव आनेराव ..................... ३७

८. छत्रपती शाहू महारजांचे शैक्षणिक कार्य
प्रा. सतीश गंगाराम ससाणे ..................... ४०

९. शैक्षणिक अमंलबजावणीकार : छत्रपती राजर्षी शाहू महाराज
प्रा.विलास पवार ..................... ४३

१०. राजश्री शाहू महाराजाचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिता
प्रा.डॉ. मच्छिंद्र कडूबा सवाई ..................... ४५

११. राजर्षि शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
वसंत भाऊराव राठोड ..................... ४८

१२. विषय - राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे ..................... ५१

## नुक्रमणिका


ामध्ये राजर्षी
ती
ाती काळे ...................... १७

क विचारसरणी व कार्याचा समाजशास्त्रीय अभ्यास
र ...................... २२

धोरण व प्रासंगिकता
...................... २५

धोरण व प्रासंगिकता
...................... २९

धोरण व प्रासंगिकता
...................... ३१

धोरण व प्रासंगिकता
...................... ३४

धोरण
...................... ३७

कार्य
...................... ४०

त्रपती राजर्षी शाहू महाराज
...................... ४३

धोरण व प्रासंगिता
...................... ४५

धोरण व प्रासंगिकता
...................... ४८

चे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता
...................... ५१




ISBN 978-93-5240-092-8


१३. छत्रपती शाहू महाराजांचे शैक्षणिक कार्य
**प्रा. रामराव चव्हाण** ...................... ५३

१४. राजर्षी शाहू महाराज यांचे अस्पृश्य निवारण व त्यांच्या शिक्षणविषयक कार्य
**प्रा. बी.पी. पवार** ...................... ५६

१५. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक योगदान
**प्रा. डॉ.कावळे बी.एन.** ...................... ५९

१६. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता.
**डॉ.सुनंदा एकनाथराव आहेर** ...................... ६२

१७. राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे स्त्री शिक्षणातील योगदान
**प्रा.बाविस्कर रविंद्र बाबुराव** ...................... ६६

१८. राजर्षी शाहु महाराजांचे शैक्षणिक धोरण व आजची परिस्थिती
**प्रा.संध्या पेंडकर देशपांडे** ...................... ६८

१९. शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण
**प्रा.डॉ.माधव कदम** ...................... ७१

२०. अधुनिक शिक्षणनिती मध्ये राजर्षी शाहूंच्या शैक्षणिक विचारांची प्रासंगिकता - एक अभ्यास
**प्रा. डॉ.एन. एन. कुंभारीकर** ...................... ७३

२१. राजर्षी शाहू महाराज : सक्तीच्या प्राथमिक शिक्षण कायद्याचे जनक
**प्रा.ज्ञानेश्वर डाखोरे, प्रा.डॉ. शिंदे आर.डी.** ...................... ७५

२२. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक योगदान
**प्रा. एस. सय्यद** ...................... ७८

२३. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार व आजची स्थिती
प्रा.चावरे एम. व्ही ...................... ८०

२४. राजर्षी शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टीकोण
प्रा.गौतम कांबळे ...................... ८२

२५. राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार
प्रा.डॉ. कदम डी.एम. ...................... ८४

ISBN 978-93-5240-092-8

# १२. विषय - राजर्षी शाहू महाराजांचे शैक्षणिक धोरण व प्रासंगिकता

प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे
समाजशास्त्र विभागप्रमुख
कला, वाणिज्य व विज्ञान
महाविद्यालय, आष्टी, जि. बीड

**प्रस्तावना -**

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात सार्वत्रिक शिक्षण प्रसारासाठी आपली उभी हयात खर्च केली. सन १८९४ साली महाराज गादीवर आले. तेव्हा बहुजन समाजात मॅट्रीक पास फक्त बोटावर मोजण्याइतके दिसून आले. कारण गावोगावी प्राथमिक शाळा नव्हत्या. त्यामुळे बहुजन समाज अज्ञानात व दारिद्र्यात डुबून गेलेला त्यांना दिसला. त्यांना राजकीय गुलामगिरी जेवढी खटकली नाही तेवढी सामाजिक, धार्मिक व शैक्षणिक गुलामगिरी खटकली. शिकायचे ते उच्च वर्णीयांनी-धनीकांनी, जमीनदारांनी! शिक्षण हे आपले काम नव्हे गरीब, दलीत व स्त्रीया यांनी शिकणे हा गुन्हा आहे, असे त्यावेळी मानले जात असे. अंधश्रद्धा व धर्मभोळेपणामुळे खेड्यापाड्यातून सारा समाज पिचून गेला होता.

**सक्तीच्या सार्वजनिक शिक्षणाची योजना -**

कोल्हापूर संस्थानात १९१२ साली प्रत्येक खेड्यात नवीन शाळा काढून त्यावर वतनदार शिक्षक नेमण्याची महाराजांनी योजना काढली. पण वतनदार शिक्षक योजनेत जमिनी मिळवण्याची जशी अडचण निर्माण झाली, तसे या धोरणात बदल करणे त्यांना भाग पडले. सन १९१४ साली त्यांनी पगारी शिक्षकच नेमले. वतनी जमिनी उपलब्ध होताच ही पगारी योजना रद्द करण्याचे त्यांनी ठरविले. पण १९१७ साली महाराजांनी ही वतनदार शिक्षक योजना बंद केली व पुन्हा पगारी 'शिक्षक योजना' त्यांनी सुरू केली. तसेच खर्चाचे बजेट मंजूर केले. देवस्थानचा आवश्यक तो खर्च करून उरलेली रक्कम या शिक्षणावर खर्च करावी, असे त्यांनी अज्ञापत्र काढले.

**गव्हर्नरांची पाहणी -**

सन १९१९ साली मुंबईचे गव्हर्नर सर लाईड जॉर्ज यांनी महाराजांच्या चालू असलेल्या सार्वत्रिक शिक्षण योजनेची पाहणी केली. त्यांनी त्यावेळी महाराजांची फार मोठी तारीफ केली. त्यावेळी महाराज साहेबांना म्हणाले, ''माझ्या प्रजेपैकी पुढारलेल्या लोकांपेक्षा निर्बल लोकांची मी अधिक काळजी घेत आहे. त्यांची परिस्थिती पाहून माझे मन द्रवते. त्यांची स्थिती सुधारण्यासाठी शक्य तेवढे प्रयत्न करणे, हे माझे सर्व कार्यातील मुख्य ध्येय आहे, म्हणून मी अलिकडे सार्वत्रिक शिक्षणाचा प्रश्न हाती घेतला आहे''.

**माध्यमिक व उच्च शिक्षणाची सोय -**

सन १८९४ साली महाराज गादीवर येताच त्यांनी राजाराम हायस्कूल व राजाराम

ISBN 978-93-5240-092-8

कॉलेजच्या सर्व गरीब विद्यार्थ्यांना नादारी (फी माफी) दिल्याचे जाहीर केले. तसेच त्याची अंमलबजावणी करण्यात आली. विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची दुसरी एक मोठी गैरसोय होती. गरीब, गरजू, दलित व मागासलेल्या अशा सामान्य जनतेची मुले हायस्कूल व कॉलेजात शिकायची इच्छा करतात पण त्यांना राहण्याची व जेवणाची सोय नव्हती. त्यामुळे खेड्यापाड्यातील अनेक बुद्धिमान मुले या गैरसोयीमुळे घरी बसत. त्यांच्या शैक्षणिक महत्वकांक्षेला व प्रगतीला या अडचणीमुळे खीळ बसे. तेव्हा महाराजांनी ही गैरसोय ध्यानी आणली. सन १८९६-९७ साली महाराजांनी जितक्या जाती-जमाती असतील त्यांच्यासाठी वसतीगृहे काढण्याची धाडसी व महत्वाकांक्षी योजना जाहीर केली. प्रत्यक्ष याची अंमलबजावणी १९०० सालापासून करण्यात आली.

विविध योजना -

शाहू महाराजांनी प्राथमिकपासून ते महाविद्यालयीन शिक्षणापर्यंत विविध योजना जाहीर केल्या. त्यापैकी एक योजना म्हणजे वसतिगृह काढणे. अशी वसतिगृहे काढण्यासाठी त्यांनी न्यायमूर्ती रानडे, नामदार गोखले, श्री. म्हस्के यांचा सल्ला घेतला होता. वसतिगृह सुरू करणे किंवा इतर योजनांमुळे विशिष्ट (उच्च) जातीच्या लोकांत ओरड सुरू झाली. 'समर्थ' या दैनिकाने त्यांच्यावर टिका केली होती. उच्च वर्गातील जातींना दलितोद्धार पसंत पडत नव्हता.

याबद्दल महाराज म्हणतात, ''ब्राह्मणांची कारस्थाने कधीच बंद होणार नाहीत, असे मला वाटते. धर्माच्या बाबतीत उत्पन्न झालेल्या मतभेदाची ब्राह्मणांना विशेष दिक्कत वाटली नाही; परंतु मागासलेल्या वर्गांना पुढे आणण्याचे माझे धोरण, मात्र या उच्च वर्णीयांना आवडत नाही, हीच खरी गोष्ट असावी. कालचक्रच्या फेऱ्यामध्ये जी नवीन परिस्थिती निर्माण झाली आहे, तिला तोंड देणे यांना प्राप्त आहे''

सारांश -

अशा प्रकारे महाराजांनी सर्व खेड्यापाड्यांत प्राथमिक शाळा काढल्या. सक्तीने प्राथमिक व मोफत शिक्षण सुरू केले. अनेक जाती-जमातींची वसतिगृहे काढली. सर्व जाती-जमातींच्या लोकांना प्राथमिकपासून उच्च शिक्षणापर्यंत सर्व समाजाला विद्यामृताचा घडा खुला केला. 'विद्या दान हेच महादान' हे महाराजांनी आचरणाने खरे करून दाखविले. महाराजांनी आपल्या विविध संस्थांमधून बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून देऊन महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्रांतीचा पाया घातला. नोक-यांत छोट्या-मोठ्या जागा भरण्याचा अधिकार महाराजांनी स्वतःकडे ठेवला होता. यावरून त्यांची शैक्षणिक दूरदृष्टी आपल्याला दिसते. या सर्वांमुळेच आज बहुजन समाजाची प्रतिष्ठा वाढलेली आपणास दिसून येते.

***



PRINCIPAL
Arts, Commerce & Science
College, Ashti (Beed) (M.S.)

2018-19

ISBN : 978-93-83672-74-5

# सत्यशोधक अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यातील विविध पैलू

संपादक

प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे

डॉ. विठ्ठल सखाराम जाधव

Shaurya Publication, Latur

**DECLARATION BY THE PUBLISHER**

**ISBN : 978-81-938137-8-2**

**Editor**

प्रा.नवनाथ ज्ञानोबा पवळे

डॉ. विठ्ठल सखाराम जाधव

**Publication**

Shaurya Publication

Khadgao Road, Kapil Nagar, Latur-413512

www.rjournals.co.in, Email-hitechresearch11@gmail.com

Mob. No. 8149668999

**Printing**

R.R.Graphics, MIDC, Latur

**First Edtion** - 1st October 2018

**Note :**-Views, idea and materials published in this ISBN Book are intellectual properties of author (s). Author(s) is/ are solely responsible for their publication and not the Editors, Principal or publisher.

© All right are reserved. No part of this publication may be reproduced, stored, retrieved or transmitted in any form, by any means, without the written permission from **Navnath Pawale and Vitthal Jadhav**

ISBN : 978-81-938137-8-2

# Index


1. मराठी साहित्यातील दिपस्तंभ : अण्णाभाऊ साठे 9
**प्राचार्य, डॉ. अरुण दळवे**

2. आंबेडकरी विचारांचा साहित्यिक भाष्यकार : अण्णाभाऊ साठे 12
**प्रा. गौतम गायकवाड**

3. आण्णाभाऊ साठे यांचे कार्यसाहित्य आणि चळवळ 21
**प्राचार्य डॉ. शेख एस.जे**

4. आण्णा भाऊ साठे यांचे कार्य, साहित्य आणि चळवळ 23
**बांगर स्वाती आदिनाथ**

5. मानवतावादी लेखक : अण्णा भाऊ साठे 29
**प्रा. गौतम नागनाथ येडे**

6. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील महिला मुक्तीचा विचार ३२
**प्रा. सय्यद अफरोज अहेमद**

7. अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यावर मार्क्सवादी विचारसरणीचा प्रभाव 35
**डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे**

8. दलित साहित्य आणि अण्णा भाऊ साठे यांच्या निवडक कादंबरी 44
सुजाता जगन्नाथ बागुल

9. अण्णासाहेब साठे यांच्या व्यक्तिमत्वाचा आणि साहित्याचा मनोसामाजिक अभ्यास. 50
**प्रा.डॉ. वाटोरे सुनिता माधवराव**

10. अण्णाभाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय 52
**प्रा. डॉ. गजानन गोपाळराव हेरोळे**

11. लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे कार्य आणि साहित्यातील सामाजिक मूल्य 56
**प्रा. प्रकाश वामनराव म्हस्के**

12. लातूर शहरातील गणित प्रयोगशाळाचा प्राथमिक स्तरावरील विद्यार्थ्यांची अभिरूची आणि संपादणुकीवर होणारा परिणाम एक - अभ्यास 62
**बिजले अशोक नागोराव**

13. अण्णाभाउ साठे यांचे शैक्षणिक विचार व मातंग आणि प्रमुख अनुसूचीत जातींची शैक्षणीक स्थिती 66
**नागनाथ जयवंत मनुरे, प्रा.किरणकुमार मनुरे**

ISBN : 978-81-938137-8-2


| | | |
|---|---|---|
| 14. | आण्णा भाऊ साठे : एक मार्क्सवादी विचारवंत<br>**प्रा. राजाराम कांबळे** | ७९ |
| 15. | अण्णाभाऊ साठे यांचे मानवतावादी तत्त्वज्ञान<br>**प्रा.नरवाडे बालाजी मारोतराव** | 88 |
| 16. | अण्णाभाऊ साठे : एक व्यक्तिमत्त्व आणि विचार<br>**प्रा.डॉ.देविदास ग्यानुजी नरवाडे** | 94 |
| 17. | अण्णा भाऊ साठे यांच्या कथेतील गावगाड्याचे चित्रण<br>**प्रा. डॉ. शीला धम्मपाल रत्नाकर** | ९८ |
| 18. | अण्णा भाऊ साठे : व्यक्ती आणि वाङ्मय<br>**प्रा.ज्ञानेश्वर किसन म्हात्रे** | १०५ |
| 19. | अण्णाभाऊ साठे यांच्या साहीत्यातील समाज वास्तव<br>**डॉ.रमेश वाघमारे** | ११९ |
| 20. | अण्णा भाऊ साठे आणि त्यांच्या 'बरबाद्या कंजारी' या कथेतील संवाद हा नाटयसंहीता घटक"<br>**श्री. संतोष बाबुराव गालफाडे , प्रा. डॉ. चंद्रशेखर कणसे** | 122 |
| 21. | अण्णाभाऊ साठे : एक व्यक्तिमत्त्व आणि विचार<br>**प्रा.डॉ.देविदास ग्यानुजी नरवाडे** | 134 |
| 22. | अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाज वास्तव<br>**प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे , प्रा. डॉ. भगवान शंकर वाघमारे** | |
| 23. | परिवर्तनवादी साहितीक अन्नाभाऊ साठे<br>**प्रा. झाडके जी. आर., डॉ. पिसाळ एच. जी.** | |
| 24. | आण्णाभाऊसाठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव<br>**प्रा.महेश चौरे** | |
| 25. | **अण्णा भाऊंच्या लोकनाट्यातील कामगारविषयक भूमिका**<br>आरती केशवराव गायकवाड | |
| 26. | **अण्णा भाऊ साठे यांचे शाहिरी वगनाट्य**<br>पाटील महेंद्र धोंडू | |

27. आजचे दलित साहित्य : एक चिंतन
**प्रा. डॉ. गणेश मोहिते**
28. अण्णाभाऊ साठे : साहित्य की व्यक्तिरेखा
**प्रा. डॉ. बुक्तरे मिलिंदराज**
29. Brief Review of Annabhau Sathe's Literature
**Dr. Shama B. Lomate**
30. Annabhau Sathe: The Writer Ofdowntrodden
**Assist. Prof. Dr. Ghodke J. V.**
31. Elements of Feminism in The Literature of Anna Bhau Sathe, With Special Reference To The Novel Vaijayanta
**Ananda D. Pimpale**
32. Annabhau Sathe: A Socialist Thinker
**Dr. Saruk C.U.**
33. Marginal and Marginality in Anna Bhau Sathe's *Makdicha Maal*
**Mr. Dhananjay Sathe**
34. Annabhau Sathe: The Writer Ofdowntrodden
**Assist. Prof. Dr. Ghodke J. V.**
35. Annabhau Sathe - A Humanitarian Global Writer
**Sunil Dhapse**

ISBN : 978-81-938137-8-2

21

# अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाज वास्तव

**प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे**
*(समाजशास्त्र विभाग),*
**प्रा. डॉ. भगवान शंकर वाघमारे**
*(लोकप्रशासन विभाग), कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय आष्टी, आष्टी, ता.आष्टी जि.बीड*

---

**प्रास्ताविक :-**

तुकाराम भाऊराव साठे ऊर्फ अण्णा भाऊ साठे हे मराठी साहित्यातील अग्रगण्य लेखक, साहित्यीक व समाजसुधारक होते. वर्गविग्रहाचे तत्वज्ञान सर्वसामान्य जनतेपर्यंत पाहोचविणारा जातीवंत लेखक त्यांच्यात आढळून येतो. ग्रामीण बोलीभाषा आणि कला अवगत असलेले ते महान कादंबरीकार होते. कादंबरी, कथा, पोवाडा, लोकनाट्य या सर्व साहित्य प्रकाराला अण्णाभाऊंनी वेगळया उंचीवर नेऊन ठेवले. पोवाडे, लावण्या, गीतं, पद या काव्यप्रकाराचा त्यांनी सामान्य जनतेत प्रचार आणि प्रसार केला. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्यतोत्तर काळात राजकीय, सामाजिक व आर्थिक प्रश्नांविषयी संयुक्त महाराष्ट्र चळवळ, गोवा मुक्ती लढा, यामध्ये त्यांनी दिलेले योगदान महत्त्वपूर्ण आहे. ते अंतर्बाह्य मार्क्सवादी होते. विकासापासून वंचित आणि गावकुसाबाहेरचे हे दुर्लक्षीत व्यक्तीमत्व स्वयंप्रकाशीत होते. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवर “जग बदल घालुनी घाव – सांगुनी गेले मला भीमराव” हे गीत असेल किंवा शाहीरी, पोवाडे, गाणी, तमाशा इत्यादीमध्ये त्यांनी स्वत:च्या साहित्यकृती निर्माण केल्या. हे सर्व साहित्य म्हणजे दीन-दलित, दुबळे, वंचीत, शोषित यांच्या आंतरात्म्याचे प्रकटीकरण होते असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. त्यांच्या सर्व साहित्यात समाजाचे वास्तव अधोरेखीत झालेले आढळून येते.

**- संशोधन निबंधाची उद्दिष्टये :-**

१) अण्णा भाऊ साठे यांच्या साहित्यातील समाजवास्तव शोधणे.

२) वेगवेगळया साहित्यप्रकारांविषयी त्यांची भूमिका समजून घेणे.

३) दलित, पिढीत, दुर्बल घटकांना दिलेले प्रतिनिधित्व अण्णा भाऊंच्या साहित्यात शोधणे.

४) समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून अण्णा भाऊंच्या विचाराचा परामर्ष होणे.

५) अण्णा भाऊंचे विचार-दर्शन आणि रूद्यकालिन समाज यातील वास्तवता अभ्यासणे.

६) आण्णा भाऊंचे संपर्ण मराठी साहित्य समजून घेणे.

- विवरण आणि स्पष्टीकरण : -

**- अण्णाभाऊंवरील प्रभाव : -**

आई ही जगप्रसिद्ध कादंबरी लिहिलेले रशियन विचारवंत मॅक्झीम गॉर्की याचा प्रभाव अण्णा भाऊंवर पडलेला दिसून येतो. गॉर्की आणि अण्णा भाऊ या दोघांच्या विचारात खुपच साम्य मला आढळून येते. "समाज" या चालत्या-बोलत्या विद्यापीठातच दोघांचेही शिक्षण झाले. कष्ट करण्याची जिद्द आणि समाजवादी विचारसरणी हे आणखी काही पैलू त्यांच्या जीवनात आढळतात. त्यानंतर भारतीय सामाजिक विचारवंतामध्ये महात्मा ज्योतिबा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान विचारवंताच्या विचाराचा आदर्श आणि प्रचंड प्रभाव अण्णा भाऊंवर पडलेला दिसूनर येतो.

**जीवनपरिचय :-**

तुकाराम उर्फ शाहीर अण्णा भाऊ साठे यांचा जन्म 01 ऑगस्ट 1920 रोजी सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यात वाटेगाव या लहान खेड्यात झाला. वडीलांचे नांव भाऊराव सिध्दोजी साठे व आईचे नांव वालुबाई होते. त्यांना एक भाऊ आणि एक बहीण होती. त्यांचे नावरस नांव तुकाराम ठेवले होते. आपण म्हणतो नावात काय आहे, परंतु प्रसिद्ध नाटककार-साहित्यीक विल्यम शेक्सपिअर म्हणतात नांवात बरेच काही असते. संत तुकाराम महाराजाप्रमाणेच या तुकारामाने आपल्या आयुष्यात मोठी समाजक्रांती घडवून आणली. मुलाचे पाय पाळण्यात दिसतात असे म्हणतात, तसे वालूबाईच्या या लहान तुकारामाने संपूर्ण समाजाला हादरे देण्याचे कार्य केलेले आहे.

**अण्णा भाऊंच्या साहित्यातील समाज वास्तव :**

अण्णा भाऊ म्हणाले होते, "जग बदल घालूनी घाव, सांगुनी गेलेत मला भिमराव". महात्मा ज्योतिबा फुले म्हणाले होते, "विद्येवीना मती गेली, मतीविणा गती गेली, गतीविना वित्त गेले, वित्ताविना शुद्र खचले, एवढे अनर्थ एका अविद्येने केले." डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते, "शिका संघटित व्हा। आणि संघर्ष करा।". या तत्कालीन विचारवंताच्या कार्याचा आणि विचारांचा वसा घेऊन अण्णा भाऊंनी समाज परिवर्तन घडवून आणले.

पावलो पावली ते संपूर्ण समाजाचा विचार करत असत. समाजात एक प्रकारची आस्मिता निर्माण करण्याचा प्रयत्न त्यांनी आपल्या लेखणीतून व विविध साहित्यप्रकारातून केला. त्यांच्या साहित्यात स्वातंत्र्य, समता, बंधुता या मूल्यांचा समावेश झालेला दिसतो. त्यांचे साहित्य हे इंग्रजी विचाराचे व उच्चवर्गाचे साहीत्य नाही. समाजातील शोषित, दलित, पिचलेला, दुर्बल समाज, त्यांच्या कथा कादंब-यात प्रस्तूत झालेला दिसतो. त्यांनी आपल्या साहित्यातील **"फकीरा"** या सामान्य कुळातील व्यक्तीला नायकत्व दिले. **"वैजयंता"** ही कादंबरी अशाच एका नवीन विषयाकडे आपणाला घेऊन जाते. तमाशा कलावंताचे शोषण समाज कशा प्रकारे करतो हे त्यांनी या कादंबरीत विस्ताराने मांडले आहे. आजही आपण पाहतो की समाज जेवढा सभ्यतेकडे (Civilized) वाटचाल करत आहे तेवढेच चारित्र्यहिन लोक आढळत आहेत. सभ्यता आणि चारित्र्य याचे प्रमाण व्यस्त(कमी) होताना आढळत आहे. आजच्या समाजातील वास्तवता अण्णा भाऊंच्या साहित्यामार्फत आपणाला समजून घ्यायची आहे. हा लेख प्रपंच करण्याचा मुख्य विषय हाच आहे.

**"माकडीचा माळ"** ही भटक्या-विमुक्तांच्या सामाजिक जीवनांचे दर्शन घडवून आणते. खरे पाहता तर भटके विमुक्त समाज हे ब्रिटिश काळापासूनचे दुर्लक्षित व अविकसित घटक आहेत. त्यांना समाजाच्या वेशीवर आणण्याचे (अभ्यासातून) काम अण्णा भाऊंनी केलेले आहे. समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे काम ही कादंबरी करताना दिसते. आयुष्यभर एवढे मोठे साहित्यीक अण्णा भाऊ एका झोपडीत राहिले. कारण समाजातील त्यांचे बांधव ज्या हालाखीचे जीवन जगतात ते दु:ख, दारिद्र्य त्यांना जवळून पहायचे होते. त्यांना वाटले असते तर ते एखाद्या उच्चभ्रू वसतीत राहु शकले असते, परंतु त्यांनी तसे केले नाही.

बहुजनांची अस्मिता निर्माण करण्यात अण्णा भाऊंच्या साहीत्याचा मोठा वाठा आहे. समाजातील कष्टकरी, दलित, पिढीत, शोषित, शेतकरी, शेतमजूर, भटके-विमुक्त या सर्व समाजघटकांना त्यांनी आपल्या लेखणीने जागे केले. स्वत:चे अस्तित्व हारवून बसलेल्या समाजात नवजागृती निर्माण करण्याचे कार्य अण्णा भाऊंनी केले. या सर्व घटकाच्या हालअपेष्टा त्यांनी जवळून पाहिल्या होत्या. यामुळेच त्यांच्या विचाराला दिशा मिळत गेली आणि त्यांचे साहित्य समृध्द होत गेले. माणूसकीचे हक्क नाकारणाऱ्या समाजातील प्रवृत्ती त्यांना संपवायच्या होत्या. त्यासाठी त्यांनी आपली लेखनी नेहमी तळपत ठेवली. मुळात अण्णा भाऊंची घडण हीच वेगळया पध्दतीने झाली होती.

अण्णा भाऊंनी त्यांच्या साहित्याचा उपयोग समाजबांधणीसाठी केला. त्यांच्या साहित्याचा मूळ उद्देशच समाज प्रबोधन करुन समाजात नवचेतना जागृत करणे हा होता. त्यांचे साहित्य केवळ मनोरंजनाचे माध्यम नव्हते, तर समाज प्रबोधन हा त्यांचा उद्देश होता. त्यांच्या साहित्यात नैतिकता आहे. समाजातील सर्व स्तरातील लोकांना शिक्षण उपलब्ध व्हावे म्हणून जाती-धर्माची बंधने तोडून सर्वांचा विकास घडवून आणता येईल यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. त्यामुळेच स्वत: कोणत्याही शाळेत वा विद्यापीठात न शिकलेली ही व्यक्ती राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय दर्जाचे साहित्य निर्माण करु शकली. शाळेत गेल्यावर पहिल्याच दिवशी मुळाक्षरे काढता आली नाहीत म्हणून वर्गशिक्षकाने शाळेतून मार देऊन बाहेर काढले, तेव्हाच त्यांनी ठरविले की आजपासून “समाज” हीच माझी शाळा आणि देशबांधवाचा उध्दार हेच माझे “विद्यापीठ”. सांगलीपासून मुंबईपर्यंत पायी प्रवास करुन त्यांनी मुंबई गाठली. कौटुंबिक जीवनात अनेक हालाकीची कामे केली. गिरणी कामगार म्हणून काम केले. जीवनातील हे कडुगोड अनुभव त्यांना पुढील आयुष्यात कामी आले. अन्यायाविरुद्ध चीड, झोकुण देण्याची वृत्ती, साधेपणा, बुध्दीचातुर्य या गुणांच्या जोरावर त्यांनी जगविख्यात साहित्य निर्मिती केली. कामगारांच्या दु:खाची जाणीव त्यांनी जवळून झाली. त्यांच्या साहित्याचा प्रभाव जनतेवर पडला, म्हणून आज आपण त्यावर आंतरराष्ट्रीय परिषद घेत आहोत.

**निष्कर्ष :**

मातंग समाजात जन्मलेले अण्णा भाऊ अल्पशिक्षित असले तरी त्यांच्या साहित्यामुळे ते समाजाच्या श्रेष्ठ साहित्यीकात गणले गेले. अण्णा भाऊंचे साहित्य हे अंतरमनाचा ठाव घेणारे व काळजाला भिडणारे आहे. समाजपरिवर्तन हा त्यांच्या साहित्याचा मानबिंदू होता. ग्रामीण, दलित, भटके-विमुक्त लोकांच्या जगण्याला योग्य दिशा देण्याचे कार्य त्यांच्या लेखणीने केले आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणायचे “मार्क्सवाद भाकरीचा प्रश्न सोडवील पण माणूस म्हणून जगण्याचा प्रश्न शिल्लक राहतोच, आणि मला भाकरीपेक्षा इज्जत आणि स्वाभिमान प्यारा आहे. या विचाराने अण्णा भाऊ भारावले होते. त्यांच्या सर्व साहित्यातून समाज वास्तव चित्र त्यांनी रेखाटले आहे. अण्णा भाऊंनी उभ्या आयुष्यात दोन गोष्टीचा तीटकारा केला एक म्हणजे धर्म आणि बुवाबाजीपातून होणारी पिळवणूक. आण्णा भाऊंनी या दोन

गोष्टीवर आपल्या लेखणीतून कोरडे ओढले. बहुजनांच्या या थोर साहित्यीकाचे 18 जूलै 1969 साली देहावसान झाले.

**संदर्भ साहित्य :-**

१) अण्णा भाऊ साठे चरित्र आणि कार्य – प्रा. विजयकुमार जोरणे

२) अण्णा भाऊ साठे – श्री. अर्जुन इंगळे

३) फकीरा – अण्णा भाऊ साठे

४) माकडीचा माळ – अण्णा भाऊ साठे

५) दै. लोकसत्ता लोकरंग पुरवणी

2018-19 03



# लिंग समभाव आणि महिला सक्षमीकरण

मुख्य संपादक
प्राचार्य डॉ. अशोक खैरनार

संपादक
प्रा. कांतीलाल सोनवणे
प्रा. अतिष मेश्राम
डॉ. प्रियंका सुलाखे



अथर्व पब्लिकेशन्स

20-10-2018




अथर्व पब्लिकेशन्स्
ऑनलाईन पुस्तक खरेदीकरिता...
www.atharvapublications.com

ISBN 978-93-87129-94-8

₹ - 695/-

राज्याच्या प्राध्यापकांनी, संशोधकांनी, रवंतांनी विचार मांडावेत व त्यांचे लेखनाद्वारे वाचक, संशोधक अभ्यासकासाठी उपलब्ध शोध निबंध पुस्तकाचे प्रकाशन करीत आहोत. तेसाद मिळाला त्याचा मनस्वी आनंद वाटतो साठी महाराष्ट्र राज्य महिला आयोग, मुंबई र्य लाभले त्याबद्दल मी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय चर्चासत्राच्या यशस्वी पुस्तक ताणे शिक्षण प्रसारक मंडळाचे मा. अध्यक्ष, दचंद्र जगन्नाथ शाह, अध्यक्ष आदर्श कला –जैताणे यांचे अनमोल मार्गदर्शन व क व प्राध्यापकेतर बंधू-भगिनींचे सहकार्य र्य या त्याने ऋण व्यक्त करतो व अशी ीय चर्चासत्रातील शोधनिबंध संकलन रसिक, काप्रति विनम्र सादर!

– **डॉ. अशोक पी. खैरनार**
प्राचार्य, आदर्श कला महाविद्यालय
निजामपूर–जैताणे

– अनुक्रम –


- **स्त्री–पुरूष समानतेसाठी स्त्री सबलीकरण : एक चिकित्सा** ..... १९
  – प्रा.ए.बी. महाजन
- **अक्कलकुवा तालुक्यातील ग्रामिण भागात पुरूष व महिला विषमतेचे भौगोलिक अध्ययन** .................... २७
  – प्रा.एम.एल. सावंत
- **जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून ग्रामिण महिलांचे सक्षमीकरण** ...................... ३३
  – प्रा.डॉ. अरुण उखा पाटील
- **राष्ट्रीय विकास आणि महिला सशक्तीकरण (मानवी हक्काच्या दृष्टिकोनातून)** .................. ३७
  – प्रा. दिलीप हरसिंग राठोड
- **भारतातील महिलांचे स्थान** ................................ ४१
  – प्रा. वळवी उर्मिला गणेश
- 'अधांतर' या नाटकातील स्त्री प्रतिमा ........................ ४९
  – प्रा. भैय्या दिलीप पाटील
- **साहित्य व सांस्कृतिक क्षेत्रातील महिलांचे योगदान : सशक्तीकरणाचा नवा दृष्टिकोन** .......... ५५
  – प्रा.डॉ. दिलीपसिंह श. निकुंभ
- **भारतीय महिलांचे घटनात्मक आणि कायदेशीर अधिकार व आजची स्थिती** ......................... ६१
  – प्रा. दिलीप हरसिंग राठोड
  – श्रीमती वैशाली गुलाबराव सावंत
- **भारतातील स्त्रियांची सामाजिक स्थिती** ...................... ६५
  – डॉ. विश्रांती ग. मुंजेवार
- **महिला शिक्षकांमध्ये संविधानात्मक आणि कायदेशीर अधिकारांच्या जाणीवेचा अभ्यास करणे** .................. ७४
  – डॉ. कविता साळुंके
  – कु. ज्योती लष्करी

- साहित्यातील समाजसुधारकांचा स्त्री विषयक विचार.......... ७९
  - प्रा.डॉ. संजय राजधर महाले
- स्वयंसहाय्यता बचतगट आणि महिला सक्षमीकरण........... ८४
  - डॉ. संभाजी पाटील
- महिला सबलीकरण आणि स्त्री जीवन ...................... ९०
  - प्रा. नाईक पी.एन.
- राष्ट्रीय विकास आणि महिला सक्षमीकरण .................. ९२
  - प्रा. सुरेश रमण देसले
- भारतातील आर्थिक नियोजन आणि स्त्री सक्षमीकरण ........ ९७
  - प्रा. श्रीमती नेरे अरुणा विजयकुमार
- जात, लिंगभाव आणि हिंसाचार ........................... १०२
  - प्रा. गजेंद्र सोमा जगदेव
- श्रीमती इंदिरा गांधी ........................................ १०७
  : भारताच्या प्रभावशाली महिला पंतप्रधान
  - प्रा. शरद बाबुराव सोनवणे
- महिला सबलीकरण आणि सामाजिक स्थित्यंतरण .......... ११३
  - प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे
- गीता साने यांच्या 'हिरवळीखाली' ......................... ११६
  या कादंबरीमधील स्त्री चित्रण
  - प्रा. मिलिंदकुमार भिकाजी देवरे
- निवडक दलित कथेतील स्त्री दर्शन......................... १२१
  - प्रा. अरुण डी. मोरे
- 'कुलवधु'चे कथानक व सामाजिक स्थिती ................. १२५
  - प्रा. निलेश एकनाथ पाटील
- महिलांचे घटनात्मक व कायदेशीर अधिकार ................ १३३
  - प्रा.डॉ. राजू परभत निकम
- महिला सक्षमीकरण आणि महिलांचा राजकीय सहभाग ..... १४०
  - प्रा. रमेश एकनाथ भारुडकर
  - प्रा. गजानन भिकाजी फुलसावंगे

सरस आहेत हे इंदिरा गांधींनी आपल्या


रतीय राजनीति – विकास और विश्लेषण',
. पृ. ३३१.
रा), '२४ अकबर रोड', चिनार पब्लिशर्स,

न), 'इंदिरा गांधी आणिबाणी व भारतीय
१६, पृ १४८.
र (संपा.), 'असा घडला भारत १९४७–
पृ. ४१८.

वान दातार), 'ऑपरेशन ब्लू स्टार – जस
०१६, पृ. १४८.


## महिला सबलीकरण आणि सामाजिक स्थित्यंतरण


– प्रा. दत्तात्रय प्रभूराव मुंढे
समाजशास्त्र विभागप्रमुख, कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय
आष्टी, ता. आष्टी, जि. बीड


**प्रस्तावना**

समाजशास्त्रीय अभ्यासात 'वैयक्तिक आणि सामाजिकदृष्ट्या महिला सबलीकरण आणि सामाजिक स्थित्यंतरण' हा विषय अतिशय महत्त्वाचा आहे. मुळात मनुष्य हा जन्मतः नर–मादी असतो. पुढे सामाजिकरणातून नराला पुरुषत्व तर मादीला स्त्रीत्व बहाल केले जाते. हा भेदभाव कसा व कोणत्या प्रकारे केला जातो, याचे उत्तम उदाहरण म्हणजे स्त्री–भ्रुण हत्या.

भारतीय समाजाचा इतिहास पाहत असताना पूर्वी स्त्रीयांना देवतेचे स्थान होते. समाजात स्त्री–पुरुष समानता होती. स्त्री ही जननी आहे, माता आहे, सृजनशीलता आहे. तीची पूजा केली जात असे. परंतु, मध्ययुगीन काळात स्त्रीयांवर अनेक बंधने लादली गेली. तिच्या स्वातंत्र्यावर पुरुषांनी कब्जा केला. त्यामुळे अर्धी लोकसंख्या समाज विकासातून बाहेर फेकली गेली.

आधुनिक काळात आपण लोकशाहीचा स्वीकार केला असला तरी स्त्री आजही पराधीन आहे. तिच्यावर अनेक प्रकारची बंधने आहेत. खरंतर स्त्रीला सक्षम/सबल करण्याची वेळ का यावी? 'पृथ्वीवर जेव्हा संहार झाला तेव्हा स्त्रीने पृथ्वीला वाचविले' असे जुन्या ग्रंथात लिहिले आहे. स्त्री ही सृष्टीची निर्माती आहे. या दृष्टीने आपण या ठिकाणी संबंधित विषयाचा ऊहापोह करणार आहोत.

**संशोधन विषयाची उद्दिष्ट्ये –** १) भारतीय समाजातील बदलांचा अभ्यास करणे. २) स्त्रीयांच्या समस्यांची जाणीव समाजाला करुन देणे. ३) स्त्री–पुरुष समानता कृतीत आणणे. ४) लिंगभेदाचा अभ्यास करणे. ५) संपूर्ण समाजातील स्त्री–समस्यांचा अभ्यास करणे. ६) स्त्रीयांची मानसिकता बदलवून तीला सक्षम बनविणे.

**विषयाचे महत्त्व**

**स्त्री सबलीकरण म्हणजे काय?**

स्त्री–सबलीकरण म्हणजे काय? हे सांगताना असे म्हणता येईल की, स्त्री–पुरुषात असे संबंध प्रस्थापित करणे की ज्यामध्ये दोघेही एकमेकांना साथ देतील, आणि अप्रत्यक्षपणे स्वतःबरोबर कुटुंब व समाजाला सशक्त बनवतील. यामध्ये

प्रामुख्याने प्रत्येकानेच स्वत:च्या हक्काबरोबर इतरांच्या अधिकाराची जाणीव ठेवणे अभिप्रेत आहे. स्वत: सबल होत होत इतरांनाही सबल बनवायचे आहे. यामध्ये प्रत्येकाने विशेषत: स्त्रियांची मानसिक ताकद वाढविणे, त्यांना सक्षम बनविणे हा महत्त्वाचा पैलू आहे. यामध्ये स्त्रीयांत चिकाटी, जिद्द, बदलांची क्षमता, धैर्य निर्माण करुन छळ व अन्यायाला विरोध करणे म्हणजे महिला सबलीकरण होय.

परिस्थितीवर मात करुन स्वत: बदलणे व इतरांना विचार बदलायला प्रवृत्त करणे, न्यायाची चाड व अन्यायाची चीड निर्माण करणे म्हणजे महिला सबलीकरण होय. यासाठी स्त्रियांना नक्कीच किंमत मोजावी लागेल. परंतु, यामुळे समाजव्यवस्थेत सुधारणा घडून येऊन सामाजिक स्थित्यंतरण/रुपांतर घडून येईल आणि हाच आपल्या अभ्यासाचा मूळ विषय आहे, की जो स्त्री सबलीकरणातून सामाजिक स्थित्यंतरणाचा/रुपांतरणाचा अभ्यास करणे.

**महिला सबलीकरणाची गरज का आहे?**

१९९० मध्ये 'National Comission for Women' स्थापन झाले. स्त्रीयांबरोबर पुरुषांनीही समतेचे तत्त्व पाळले पाहिजे असे त्यात नमूद केले आहे. परंतु अनेक शतकांपासून स्त्रीला हिन लेखले जाते. जन्म, खेळ, हसणे, बोलणे, चालणे, इत्यादींवर मर्यादा घातल्या जातात. शिक्षणात फरक केला जातो. कुटुंबात स्त्रीला आणि मुलींना जखडून ठेवले जाते. संस्कार व सामाजिकरणामुळे जरी हे होत असले तरी यातून त्या दुर्बल बनतात. म्हणून स्त्री-सबलीकरणाची खरी गरज आज आहे. समाजात बदल (Transformation) होत असला तरी त्यामध्ये आणखी बरीच प्रगती करण्यास वाव आहे. उदा. अलिकडे मुलांना शिकलेली मुलगी बायको म्हणून हवी असते. परंतु कुटुंबाची सत्ता मात्र ते स्वत:कडेच ठेवतात. वंश, नाव, संपत्ती (तीची कमाई असली तरी) याची मालकी पुरुष स्वत:कडे ठेवतात. याचा अर्थ स्त्रीयांचा कुटुंबातच दर्जा दुय्यम आहे, आणि बहुतांश स्त्रीयांनीही त्याला मान्यता दिलेली आहे. कुटुंबात नाते असमानतेचे आहे. म्हणून कुटुंबापासून देशापर्यंत सत्तेचे विकेंद्रीकरण करावे लागेल. म्हणून महिला सबलीकरणाची आज खरी गरज आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे – १) महिलांचे आरोग्य खालावलेले आहे. २) निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. ३) दुहेरी काम करतात. (कुटुंब आणि नोकरी किंवा कुटुंब व शेती) ४) कायद्याची माहिती नाही. ५) न्यूनगंड आहे. ६) निर्णयक्षमता कमी (निर्णय घेऊ दिला जात नाही) ७) स्वत:च्या ताकदीची जाणीव नाही. ८) आत्मविशवास नाही.

मुळात 'सामाजिक दर्जा' ही संकल्पना पुरुषांनी तयार केलेली आहे. प्राचीन कुटुंबापासून आजच्या प्रगत कुटुंबापर्यंत स्त्रीला समान दर्जा नाही. अनेक अधिकार

इतरांच्या अधिकाराची जाणीव
इतरांनाही सबल बनवायचे आहे.
ं ताकद वाढविणे, त्यांना सक्षम
त्रीयांत चिकाटी, जिद्द, बदलांची
ाला विरोध करणे म्हणजे महिला

व इतरांना विचार बदलायला प्रवृत्त
ाण करणे म्हणजे महिला सबलीकरण
मोजावी लागेल. परंतु, यामुळे
जिक स्थित्यंतरण/रुपांतर घडून येईल
य आहे, की जो स्त्री सबलीकरणातून
भ्यास करणे.

आहे?

sion for Women' स्थापन झाले.
ले पाहिजे असे त्यात नमूद केले आहे.
ले जाते. जन्म, खेळ, हसणे, बोलणे,
ा. शिक्षणात फरक केला जातो. कुटुंबात
ते. संस्कार व सामाजिकरणामुळे जरी हे
ातात. म्हणून स्त्री-सबलीकरणाची खरी
nsformation) होत असला तरी त्यामध्ये
आहे. उदा. अलिकडे मुलांना शिकलेली
रंतु कुटुंबाची सत्ता मात्र ते स्वत:कडेच
कमाई असली तरी) याची मालकी पुरुष
ंचा कुटुंबातच दर्जा दुय्यम आहे, आणि
दिलेली आहे. कुटुंबात नाते असमानतेचे
सत्तेचे विकेंद्रीकरण करावे लागेल. म्हणून
रज आहे. त्याची कारणे पुढीलप्रमाणे – १)
े. २) निरक्षरतेचे प्रमाण जास्त आहे. ३)
नोकरी वा कुटुंब व शेती) ४) कायद्याची
) निर्णयक्षमता कमी (निर्णय घेऊ दिला जात
णीव नाही. ८) आत्मविशवास नाही.
संकल्पना पुरुषांनी तयार केलेली आहे. प्राचीन
पर्यंत स्त्रीला समान दर्जा नाही. अनेक अधिकार

स्त्रियांना नाकारले जातात. उदा. मंदीर प्रवेश. सामाजिक बदल घडवून आणण्यासाठी कोणकोणत्या गोष्टी करणे आवश्यक आहे, याचाही आपणाला विचार करावा लागेल. त्याचा थोडक्यात परामर्श खालीलप्रमाणे – १) सर्व क्षेत्रात स्त्रीला समान संधी द्यावी. २) मालमत्तेचा अधिकार द्यावा. ३) राजकीय अधिकार द्यावेत. ४) महिलांमध्ये जागरुकता निर्माण करणे. ५) महिला कल्याण कार्यक्रम राबवावेत. ६) पुरुषप्रधान व्यवस्था बदलावी लागेल. ७) मुलगा-मुलगी भेद काढावा. ८) समाज घडवण्यात दोघांचे योगदान महत्त्वाचे. ९) कुटुंबातील कामात सर्वांचा खारीचा वाटा असावा. १०) अत्याचाराचे निर्मूलन (हुंडाबळी, बलात्कार, वगैरे). ११) आरोग्य, शिक्षण आणि व्यवसाय. १२) कायद्यात बदल व त्याची कडक अंमलबजावणी. १३) निर्णयाचा समान अधिकार. १४) आत्मकल्याण व आत्मसन्मान.

२०१४ ची निवडणूक झाली त्यात ५४३ खासदारांपैकी ५३ महिला आहेत. राज्यसभेत फक्त २३ महिला खासदार आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांत मात्र कायद्यानेच ५० टक्के जागांवर महिला निवडून येत आहेत. संसदेत ३३ टक्के जागा राखीव ठेवण्याचे विधेयक जाणीवपूर्वक लटकवून ठेवलेले आहे.

**विवरण आणि मूल्यमापन**

शोधनिबंधाच्या विषयाचे यथासांग अध्ययन केल्यावर आपणास असे म्हणावे लागेल, की देशाची ५० टक्के लोकसंख्या पराधिन (दुर्बल) ठेवून आपण २०२० पर्यंत विकसित राष्ट्राच्या पंगतीला बसू शकत नाहीत. सामाजिक बदल (Social Transformation) होत आहेत. सर्वच सामाजिक बदलांच्या घटकांना हादरे बसत आहेत, परंतु त्यामध्ये स्त्री-सबलीकरणामुळे समाज बदल लवकर होणारे आहेत. तसेच होणारे रुपांतर चिरकाल टिकणारे आहे. त्यामुळे विस्तारभयास्तव मी व या ठिकाणी माझा शोधनिबंध पूर्ण करतो.

**संदर्भसूची**


१. बक्षी मंगल, 'मुळीच पाऊल वाजू दे', लोकसत्ता चतुरंग पुरवणी, दि. ८ सप्टेंबर २०११.
२. गोटे शुभांगी, 'महिला सबलीकरण : स्वरुप व समस्या', वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद, २००४.
३. जावेद प्रमोद, 'स्त्री जन्माचे स्वागत करा', बायजा, अ.क्र. ५ वा, डिसेंबर २००९.
४. गोपाल दत्त कुलकर्णी, 'स्त्री एक समाजशास्त्रीय दर्शन', शारदा प्रकाशन, वजिराबाद, नांदेड ४११६०१.
५. प्रा. माणिक माने, 'भारतातील सामाजिक समस्या', विद्या प्रकाशन, नागपूर.

04

978-81-948515-7-8

# स्वराज्य ते लोकशाही : एक चिंतन

संपादक

डॉ. विठ्ठल जाधव

डॉ. रमेश लांडगे

प्रा. विठ्ठल गुंडे

Shaurya Publication, Latur

20 May-2021

978-81-948515-7-8------------------------------------------------------------------

**© Copyright, 2019, Authors**

All rights reserved. No part of this publication may be reproduced or transmitted in any form or by any means, electronic or mechanical, including photocopy recording, or any information storage or retrieval system, without permission in writing from the publisher.

The opinions/ contents expressed in this book are solely of the author and do not represent the opinions/ standings/ thoughts of Publications Name. No responsibility or liability is assumed by the publisher for any injury damage or financial loss sustained to persons or property form the use of the information, personal or otherwise, either directly or indirectly. While every effort has been made to ensure reliability and accuracy of the information within, all liability, negligence or otherwise, form any use , misuses or abuse of the operation of any methods, strategies, instructions or ideas contained in the material herein is the sole responsibility of the reader. Any copyrights not held by publisher are owned by their respective authors. All information is generalized, presented informational purposes only and presented "as is" without warranty or guarantee of any kind.

All trademarks and brands referred to in this book are for illustrative purposes only, are the property of their respective owners and not affiliated with this publication in any way. Any trademarks are being used without permission and the publication of the trademark is not authorized by associated with or sponsored by the trade mark owner.

**ISBN:** 978-81-948515-7-8
Price: 250/-
Publishing Year 2021
*Published and Printed by:*

**Shaurya Publications**
Office Address: Kapil Nagar,
Khadgaon Roda, Latur- 413512
Email- hitechresearch11@gmail.com



20 May - 2021

26. "डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक समता"
प्रा. डॉ. रंदिल गजेंद्र साहेबराव
27. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जलधोरण व विद्यूत धोरण विषयक विचार
प्रा. शिवाजी काकडे
28. डॉ. बाबासाहेब आंबेडकर: सामाजिक लोकशाही
प्रा. संतोष भावार्थे
29. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्पृश्यतेसंबंधी विचार
प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे
30. अण्णाभाऊ साठे कि कथा तमाशा
डॉ. ओमप्रकाश बन्सीलाल झंवर
31. शिवस्वराज्यआणीमहिलासक्षमीकरण
प्रा. तानाजीजाधव
32. छत्रपती शिवाजी महाराज यांचे परराष्ट्र धोरण
प्रा. डॉ. देशमुख बी जी
33. छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषिविषयक धोरण
डॉ.भेलोंडे जगदीश व्यंकटराव
34. छत्रपती शिवाजी महाराज यांचे धार्मिक धोरण
डॉ. प्रकाश बाबाराव महाजन
35. छत्रपती शिवाजी महाराज आणि प्रशासन
प्रा. डॉ. केशव अंबादास लहाने
36. छत्रपती शिवाजी महाराज आणि शेतकरी
डॉ. आप्पा दत्तू माने
37. राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतिक : छत्रपती शिवाजी महाराज
डॉ.दीपक सुभाषराव सूर्यवंशी
38. "शिवस्वराज्य आणि पर्यावरण पूरकता"
दशरथ प्रल्हाद लोडे
39. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची शैक्षणिक चळवळ
डॉ.शेख हुसैन इमाम

978-81-948515-7-8

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे अस्पृश्यतेसंबंधी विचार

प्रा. दत्तात्रय प्रभुराव मुंढे
समाजशास्त्र विभाग प्रमुख ,अ‍ॅड. बी. डी. हंबर्डे महाविद्यालय, आष्टी ता. आष्टी जि. बीड

प्रस्तावना :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विविध विचारांचा मागोवा घेत असताना त्यांनी अस्पृश्यता याबाबत व्यक्त केलेले विचार अत्यंत महत्वाचे आहेत. तत्कालीन समाजव्यवस्थेत अस्पृशता अस्तित्वात होती. माणसा-माणसात दुरावा निर्माण करणारी अस्पृशता नष्ट केल्याशिवाय सामाजिक समता निर्माण आणि सामाजिक न्याय प्रस्थापित होणार नाही. अश्पृश्यता कशामुळे निर्माण होते, अस्पृश्तेचे स्वरूप कोणते आहे याबाबत सखोल विवेचन डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे.

ज्यावेळी विशिष्ट कुटुंबात जन्म झालेल्या व्यक्तीचा समाजातील दुसऱ्या एखाद्या जातीमध्ये किंवा कुटुंबामध्ये जन्म घेतलेल्या व्यक्तीला स्पर्श झाला तर त्यास 'अस्पृश्यता' असे म्हणतात. अस्पृशता हि कृत्रिम स्वरुपाची आहे, म्हणजेच ती माणसाने निर्माण केलेली आहे. विशेषत: हिंदू समाजात अस्पृशता हि पिढ्यानपिढ्या अस्तित्वात आहे. किंबहुना हिंदू समाजाचे ते एक महत्वाचे वैशिष्ट्य आहे. अशा प्रकारे समाजात एक प्रकारची सामाजिक विषमता निर्माण होण्यास हिंदू समाजातील विचारसरणी जबाबदार आहे. सामाजिक समता निर्माण करण्याच्या दृष्टीने अस्पृशता हा महत्वाचा अडथळा आहे याची जाणीव आंबेडकरांना होती. म्हणून त्यांनी अस्पृशता नष्ट झाली पाहिजे यासाठी प्रयत्न केले.

अस्पृश्यता म्हणजे काय ?

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यता म्हणजे काय ? अस्पृश्य हे कोण आहेत याबाबत सविस्तर विश्लेषण केले आहे. सर्वसाधारणपणे गावाच्या बाहेर राहणारे अस्पृश्य असतात. समाजाच्या वर्णव्यवस्थेतील अस्पृश्य हा एक घटक आहे. ग्रामीण भागात अस्पृश्यता हि खोलवर रुजलेली आहे.

"ज्यावेळी एखादा कुटुंबात दुसऱ्या व्यक्तीला स्पर्श झाला असेल त्यामुळे त्या व्यक्तीला आपण भ्रष्ट झाला असे वाटत असेल तर त्याला अस्पृश्यता असे म्हणतात."

वास्तविक पाहता केवळ स्पर्शाने कोणतीही व्यक्ती भ्रष्ट होऊ शकत नाही. परंतु हिंदू धर्माच्या प्रभावामुळे अशी विचित्र समाजरचना तयार झाली आहे.डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू समाजाच्या अशा प्रकारच्या प्रवृत्तीवर टीका केली आहे. अस्पृश्यता हि सामाजिक ऐक्याच्या दृष्टीने घातक आहे. थोडक्यात समाजरचनेचे एक वैशिष्ट्य म्हणून अस्पृश्तेकडे पाहिले जाते.

उद्दिष्टे :-

१) समाजातील वर्णव्यवस्था समजून घेणे.
२) अस्पृश्यतेचा उगम कशामुळे झाला हे शोधणे.
३) अस्पृश्यता आणि व्यवसाय याचा संबंध अभ्यासणे .
४) जातीजातीतील सामाजिक संबंधाचा आढावा घेणे.

५) अस्पृश्तेच्या विविध पैलूचा अभ्यास करणे.

संशोधनपद्धती –

प्रस्तुत शोध निबंधाच्या अध्ययनात तथ्य संकलनाच्या व्दितीय तंत्राचा आधार घेतला आहे. विविध ग्रंथ, नियतकालिके, मासिके व वर्तमानपत्र इ. व्दितीय तंत्राचा आधार घेऊन तथ्य संकलन केले आहे.

विवरण व मूल्यमापन

१) अस्पृश्यतेच्या उत्पत्तीसंबंधी डॉ.आंबेडकरांचे मत :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या उत्पत्तीचा सिद्धांत मांडून अस्पृश्यतेच्या निर्मितीची दोन करणे सांगितल आहेत.

अ) अस्पृश्य हे पूर्वी बौद्ध होते -

बौद्ध धम्माचे तत्वज्ञान समतेचे होते. बौद्ध धम्मात जातीप्रथेला कोणतेच स्थान नाही. त्यांनी जातीप्रथेला विरोध केला. तसेच ब्राम्हनांचे वर्चस्व नाकारले. त्यामुळे ब्राम्हण बौद्धाविषयी घृणा आणि तिरस्कार करू लागले. पुढे ब्राम्हण आणि बौद्ध यांच्यातील श्रेष्ठत्वाबाबत संघर्ष होऊन ब्राम्हणांनी बौद्धावर अनेक निर्बंध लावलेत.

ब) पूर्वीचे सर्वच लोक गोमांस खात होते.

ब्राम्हणांनी गोमांस भक्षणावर बंदी आणल्यानंतर देखील अस्पृश्यांचे पूर्वज असलेल्या लोकांनी गोमांस भक्षण करणे सुरु ठेवले. म्हणून त्यांना अस्पृश्य ठरविण्यात आले.

या सिद्धांतावरून काही गोष्टी स्पष्ट होतात. अस्पृश्य हे येथील मुळचे रहिवासी आहेत. विशेष म्हणजे अस्पृश्य हे पुर्वाश्रमाचे बौद्ध लोक आहेत. त्यांच्यावर सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि धार्मिक बंधने लादून त्यांना समाजापासून बहिष्कृत ठेवण्यात आले.

२) समाजातील चातुवर्ण व्यवस्था :-

हिंदू समाजात चातुवर्ण व्यवस्था हि प्राचीन काळापासून अस्तित्वात होती. समाजात ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य आणि शुद्र असे वर्ण निर्माण करण्यात आले होते. या चार वर्णातील काही वर्ण अधिक श्रेष्ठ व काही वर्ण कनिष्ट माणण्यात आले होते. विशेषत: समाजातील कनिष्ट वर्गास (शूद्रांना) अत्यंत हिन वागणूक देण्यात येई. शूद्रांना कोणत्याही प्रकारचे अधिकार नव्हते. त्यांना एक प्रकारच्या मानसिक गुलामगिरीत जीवन जगावे लागत असे. अस्पृश्यतेच्या दृष्टीने हि व्यवस्था जाणीवपूर्वक तयार करण्यात आली होती. म्हणूनच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी चातुवर्ण व्यवस्थेवर टिका करून ती नष्ट करण्याच्या दृष्टिने प्रयत्न केले.

३) समाजातील व्यवसाय श्रेणी :-

समाजामध्ये व्यवसायावर आधारीत श्रेणी ठरविणे हे अत्यंत कठीण कार्य आहे. कोणत्याही समाजात व्यवसायाच्या आधारे श्रेणीरचना करणे अशक्य असते. भारतीय समाजात व्यवसायावर आधारित श्रेणीरचना चुकीची आहे. म्हणून हिंदू समाजातील अस्पृश्यता ही अयोग्य आहे. मानवानेच किंबहुना परंपरेने व्यक्ती व व्यवसाय यांची सांगड घातली. शुद्र जातीत जन्मलेल्या व्यक्तींनी हालक्या प्रतिची कामे करावित असा दंडक घातला. जो व्यवसाय समाजाने दुर्लक्षिलेला असतो तो व्यवसाय त्यांना करावा लागतो. म्हणूनच कनिष्ट जातीतील लोकांनी हलक्या प्रतीची कामे करणे त्यांना सक्तीचे होते.

४) व्यक्तीच्या कर्तुत्वाला महत्व नाही :-

व्यक्तीच्या कर्तुत्वास कोणत्याच प्रकारचा वाव हिंदू समाजरचनेत नव्हता. कारण व्यवसायाचे वाटप परंपरेनुसार करण्यात आले होते. म्हणूनच त्याच्याकडे चांगले कर्तुत्व होते

त्या व्यक्तीला सुद्धा हलक्या प्रतीची कामे करावी लागत असत. समाजात कृत्रिमपणे अस्पृश्यता लादलेली आहे असे डॉ.बाबासाहेब आंबडेकरांचे मत होते. जोपर्यंत समाजातील व्यवसायाची परंपरेनुसार लादलेली रचना बदलणार नाही तोपर्यंत व्यक्तीचा व समाजाचा विकास होऊ शकणार नाही. समाजातील काही लोकांना केवळ त्यांच्या व्यवसायामुळे कमी लेखावे ही बाब अमानवी होती.

५) अस्पृश्यतेची जाणीवपूर्वक निर्मिती :-

समाजामध्ये अस्पृश्यता ही जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आलेली आहे. असे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे मत होते. जी अस्पृशता समाजात लादण्यात आलेली आहे त्यामुळे समाजात वैमनस्याची व फुटाफुटीची भावना निर्माण होते. अशी जाणीवपूर्वक निर्माण करण्यात आलेली समाजव्यवस्था बदलल्याशिवाय समाजातील फुटीरता नष्ट होणार नाही. निसर्गाने अस्पृश्यता निर्माण केलेली नसून समाजातील काही घटकांनी स्वत:च्या हितसंबंधासाठी अस्पृशता हि जाणीवपूर्वक निर्माण केलेली आहे.

६) जाती-जातीतील संघर्ष :-

समाजव्यवस्थेत काही जातींना वेगळा सामाजिक दर्जा व वेगळी वागणूक देण्यात आली. त्यामुळे समाजात जातीजातीमध्ये संघर्ष उद्भवतो. भारतीय समाजात उच्चवर्ण व कनिष्ट वर्ण या दोन्हीमध्ये वैमनस्याची भावना निर्माण झाली. काही धार्मिक विधींना उच्च वर्ण अधिक महत्व देतात. कनिष्ट वर्गाचे लोक महत्व देत नाहीत म्हणून त्यांना अस्पृश्य मानण्यात येते.

७) अस्पृश्तेच्या विविध पैलूंचा अभ्यास :-

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेच्या विविध पैलूंचा पद्धतशीरपणे अभ्यास केला. अस्पृश्यतेचे त्यांनी मूळ शोधले असे नाही तर अस्पृश्यतेचे स्वरूप कशा प्रकारचे आहे हा एक महत्वाचा विचार त्यांनी व्यक्त केला.

समाजात दिसुन येणारी अस्पृश्यता ही समाजातील अशुध्दतेपासून वेगळी आहे. अस्पृशता व शुद्धता या दोन्ही बाबी एकच आहेत असे म्हणने चुकीचे ठरते. अशुध्तेची निर्मिती हि समाजातील अस्पृश्तेपासून झाली असावी असे त्यांना वाटत होते. प्राचीन काळापासून समाजात अशुद्धता अस्तितवात होती परंतु अस्पृत्श्यता मात्र अस्तित्वात नव्हती. याचा अर्थ असा कि अस्पृश्यता हि केवळ काही लोकांचे हितसंबंध जोपासण्यासाठी कालांतराने समाजात आली. थोडक्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्यतेबाबत वेगवेगळे पैलू स्पष्ट केले. अस्पृश्तेच्या बाबतीत अधिक सखोल भूमिका त्यांनी मांडली.

सारांश :-

अस्पृश्यता नाहीशी व्हावी म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सामाजिक समतेचा पुरस्कार करताना 'मनुस्मृती' या ग्रंथाचे दहन केले. कारण 'मनुस्मृती' या ग्रंथात जातीव्यवस्थेला अधिक महत्व दिले होते, आणि अस्पृश्यांना हीन लेखण्यात आले होते. महाडच्या ठिकाणी त्यांनी अस्पृश्यतेविरुद्ध सत्याग्रह केला. महाडच्या बाबतीत इतिहासात चवदार तळे म्हणून तो सत्याग्रह प्रसिद्ध आहे.

अस्पृश्यांना त्याकाळी हिंदुच्या मंदिरात प्रवेश मिळत नव्हता म्हणून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी नाशिकच्या राममंदिरात प्रवेश मिळावा म्हणून सत्याग्रह केला. मंदिरात प्रवेश करण्यामागे त्यांची भूमिका एवढी होती की हिंदू समाज माणसा-माणसांत भेदभाव करत आहे, तसेच माणसाला माणसासारखे जगू देत नाही. अशा परिस्थितीत अस्पृश्यता दूर झाल्याशिवाय माणसा-माणसात असणारे अंतर कमी होऊ शकणार नाही असा त्यांचा दृष्टीकोन होता.

अस्पृश्यता निवारण करण्यासाठी डॉ.बाबसाहेब आंबेडकरांनी व्यापक प्रमाणावर मोहीम हाती घेतली. विविध प्रकारच्या मार्गाचा अवलंब करून सर्व समजाचे व सरकारचे लक्ष वेधले.

सारांशाने आपणास असे म्हणावे लागते की अस्पृश्यता हे हिंदु समाजाचे वैशिष्ट्य आहे. वांशीक भेद अस्पृश्यतेचे उगमस्थान आहे. व्यवसायामुळे समाजात काही लोकांना कनिष्ट मानले. शेवटी ते म्हणतात की अस्पृश्यता ही लोकशाहीला अत्यंत घातक आहे. म्हणून त्यांनी राज्यघटनेत अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरविला.

संदर्भ :-

१) प्रदीप आगलावे, 'भारतातील सामाजिक समस्या' श्री साईनाथ प्रकाशन, धरमपेठ नागपूर, प्रथमावृत्ती जुलै-२०१८ .

२) रमेश चव्हाण, 'डॉ.बाबासाहेब आंबेडकर' प्रतिमा ऑफसेट, कोथरूड पुणे-५२, पहिली आवृत्ती २०१२.

३) नामदेव ढसाळ, आंबेडकरी चळवळ आणि सोशालिस्ट, शरद पब्लिकेशन्स, मुंबई, तिसरी आवृत्ती १५-०२-२०१४.

४) शंकरराव खरात, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे राजकीय विचार श्याम दयावर्ण कोपर्डेकर, इंद्राईणी साहित्य, शनिवार पेठ, पुणे ३०.

५) डॉ.नरेंद्र जाधव, 'बोल महामानवाचे' ग्रंथाली प्रकाशन, माटुंगा मुंबई. १६. पहिली आवृत्ती २४-१०-२०१२ (खंड पहिला)

६) डॉ.ज्योती डोईफोड, 'समाजशास्त्रीय विचारप्रवाह' विद्या बुक्स पब्लिशर्स औरंगपुरा, औरंगाबाद, व्दितीय आवृत्ती २०१२.

७) प्रदिप आगलावे, 'अभिजात समाजशास्त्रीय विचार' श्री.साईनाथ प्रकाशन, नागपूर. दुसरी आवृत्ती मार्च २००७.